अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# सीबीआयविरुध्दची पंतप्रधानांची मळमळ व्यक्त

गुवाहाटी न्यायालयाचा निर्णय त्यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी केलेले आरोप या दोन्ही प्रकारांमुळे सीबीआय पुन्हा एकदा चर्चेत आलेले आहे. एकूण देशाच्या सर्व प्रकारच्या तपासयंत्रणांमध्ये सीबीआयचे स्थान काय आणि त्याला राजकारण्यांकडून, सत्ताधाऱ्यांकडून मिळणारी वागणूक हे मुद्देदेखील यानिमित्ताने पुढे आले आहेत. तीन महिन्यांपूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय म्हणजे पिंजऱ्यातला पोपट नव्हे अशी मर्मावर बोट ठेवणारी टीका करून सरकारचे कान उपटले होते. आतापर्यंत सीबीआयचा आपल्या मनाप्रमाणे वापर करून घेता येत होता. राजकीय कारणांसाठी सीबीआयमार्फत दबाव टाकले जात होते. राजकीय काटा काढण्यासाठी सीबीआयचा दंडुका वापरून सत्ताधारी पक्ष आपली दहशत निर्माण करू शकत होता. मात्र जेव्हा न्यायालयाने सीबीआयच्या बाजूने मतप्रदर्शन केले आणि देशभरातूनही सीबीआयला तपासाला स्वातंत्र्य असले पाहिजे. ती राजकीय दबावापासून मुक्त असली पाहिजे, अशाप्रकारचे मत व्यक्त झाले. संस्थेमध्ये सीबीआय म्हणजे सरकारची वेठबिगारी करणारी संस्था आहे, अशी टीका झाली होती. नंतर तर सीबीआयचे कॉंग्रेस ब्युरो ऑफ इनव्हेस्टिगेशन असे वर्णन करून तिची खिल्ली उडवली जात होती. सीबीआयच्या संचालकांनीसुध्दा या यंत्रणेवर मोठया प्रमाणावर राजकीय दबाव येतो अशी तक्रार केली होती. कोलगेट भ्रष्टाचार प्रकरणाची चौकशी सीबीआयने सुरू केल्यानंतर त्याच्या फाईल्स सीबीआयकडून मंत्र्यांनी मागवून घेतल्या आणि या तपासात हस्तक्षेप केल्याचे स्पष्ट झाले होते. सीबीआयने टू जी स्पेक्ट्रम, कोलगेट, राष्ट्रकुल स्पर्धा गैरव्यवहार, आदर्श इमारत गैरव्यवहार अशा अनेक प्रकरणात पुढाकार घेऊन चौकशी केली. टू जी आणि कोलगेट प्रकरणात तर थेट पंतप्रधान कार्यालयापर्यंत संशयाची सुई रोखली गेली. या सगळया गोष्टींचा मनमोहन सिंग यांच्या मनामध्ये काही दिवसांपासून राग धुमसत होता. एकदाचा तो असंतोष बाहेर पडला. सीबीआयने एखादी चूक आणि गुन्हा यातला फरक ओळखला पाहिजे, असा स्पष्ट आरोप ही मनमोहन सिंग यांनी केला. हे करीत असताना सीबीआय आपल्या मर्यादा ओलांडत आहे, असा आरोप करायलाही त्यांनी मागेपुढे पाहिलेले नाही. खरे तर पंतप्रधानांसारख्या सर्वोच्च पदावरच्या व्यक्तीने देशातल्या तितक्याच महत्त्वपूर्ण तपासयंत्रणेबाबत अशा प्रकारचे मत जाहीरपणे व्यक्त करावे हे अत्यंत दुर्देवी ठरते. सीबीआयविरुध्दचा हा त्यांचा राग सीबीआयच्या कामात हस्तक्षेप करणारा आणि दबाव निर्माण करणाराच म्हणावा लागेल.

## कोणाचेच नियंत्रण नको

आज देशाच्या प्रशासन व्यवस्थेवर नेमका कोणाचा धाक आहे, असा प्रश्न निर्माण होतो. सगळ्याच व्यवस्था या आपल्या नियंत्रणाखाली राहिल्या पाहिजेत. आपल्यावर मात्र कोणाचाही धाक असता कामा नये, अशी सत्ताधाऱ्यांची इच्छा आहे. 'आपण ठरवू ते धोरण आणि आपण बांधू ते तोरण' अशी मोकाट परिस्थिती त्यांना हवी आहे. आता काही प्रमाणात सीबीआयने आपले रंग दाखवायला सुरुवात केली. तेव्हा सत्ताधाऱ्यांची तोंडे काळी पडायला लागली. सीबीआयला अधिकाधिक स्वायत्तता असली पाहिजे, अशी जोरदार मागणी संसदेमध्ये अनेकवेळेला झाली. सरकारने त्याबाबतच्या सुधारणाही तयार केल्या. मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या स्वायत्ततेमुळे सीबीआय ही एकमेव संस्थादेखील आपल्या ताब्यात राहणार नाही. आपल्या अनेक लबाड्या आणि कुलंगड्या बाहेर येतील. आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांना सीबीआयमार्फत काटशह देता येत होता तोदेखील आता देता येणार नाही. अशा भयगंडाने सत्ताधाऱ्यांना ग्रासलेले दिसते. सीबीआय आपल्या अधिकारात थेट पंतप्रधान कार्यालयातून तपासासाठी कागदपत्रे मागवू शकते आणि हीच गोष्ट मनमोहन सिंग यांना खटकलेली दिसते. आपले पद आणि आपली कार्यालये याचे सर्वोच्च स्थान असूनही सीबीआय जर तपासाच्या बाबतीत प्रभावी ठरत असेल, तर तो मनमोहन सिंग यांना निश्चितच अपमान वाटू शकेल. या उद्वेगातूनच मनमोहन सिंग सीबीआयवर घसरलेले दिसतात. त्यांनी केलेल्या या टीकेमुळे सीबीआयचे कोणतेच नुकसान झालेले नाही पण, पंतप्रधानपदाचा दर्जा विनाकारण खाली आला आहे.

## राजकारण्यांना गुन्हे माफ हवे

भारताच्या लोकशाही व्यवस्थेत लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींना विशेष मान असतो ही गोष्ट खरी. परंतु, याचा अर्थ आपण कितीही गुन्हे केले तरी ते माफ केले जावेत ही त्यांची अपेक्षा धोकादायक ठरते. आजच्या व्यवस्थेमध्ये प्रशासनावर काही प्रमाणात नियंत्रण तरी आहे. परंतु सत्ताधाऱ्यांना कोणाचाच लगाम नाही. ज्याप्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला तो पाहिल्यावर त्यांच्या या बेलगामपणाने सरकारी तिजोरीची किंवा सरकारी महसुलाची वाटेल तशी लूट झाली. एकीकडे भाषणबाजी करून स्वच्छ कारभाराचे उपदेश करायचे, दुसरीकडे मात्र भ्रष्टाचाराचा चिखल माजवायचा असा दुतोंडीपणा सत्ताधाऱ्यांकडून होत राहिला. मनमोहन सिंग यांनी आपण स्वच्छ प्रतिमेचे आहोत, असे चित्र निर्माण केले. पण त्यांचे सरकार भ्रष्टाचाऱ्यांच्या घोटाळ्यांनी गाजत राहिले. सत्ताधाऱ्यांच्या या बेमुर्वतखोरपणाला काही सीमा उरलेली नाही. त्याला काही प्रमाणात रोखण्याचे काम सीबीआयसारख्या यंत्रणांकडून होऊ शकते आणि सत्ताधाऱ्यांना नेमके तेच नको आहे. भविष्यकाळात सीबीआय जर अधिकाधिक प्रभावी आणि आक्रमक झाली तर ते आणखीनच अडचणीचे होईल. यासाठी सीबीआय ही सरकारी यंत्रणा आहे आणि तिने आपल्या मर्यादेतच राहावे असे सुचविण्याचा प्रयत्न मनमोहन सिंग यांनी केला आहे. परंतु, मनमोहन सिंग यांच्या दबावाखाली सीबीआयने येण्याचे काही कारण नाही. उलट सीबीआयाने आपले योग्य ते स्थान दाखवून दिल्यामुळेच सत्ताधाऱ्यांना त्यांच्या भ्रष्टाचाराचे भूमंडळ डळमळल्यासारख्या वाटत आहे. सीबीआय जितक्या निष्पक्षपणे कार्य करेल तितके ते देशहिताचे ठरेल. ही संस्था कोणत्याही परिस्थितीत सत्ताधाऱ्यांची बटीक होता कामा नये. समाजातली आणि राजकारणातील मूल्यव्यवस्था टिकवायची असेल तर सीबीआय न्यायालये आणि निवडणूक आयोग या संस्था राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त राहिल्या पाहिजेत. मनमोहनसिंग यांनी सीबीआयवर अनाठायी टीका करून आपले हसे करून घेतले आहे.